0 2 DEC 2021
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बिंदूनामावली तपासणी शिबिर आजपासून

## शिक्षकांच्या रिक्त पदांची बिंदूनामावली करून घेण्याचे महाविद्यालयांना आदेश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

उच्च शिक्षण संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठीचे निर्बंध शिथील केले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील रिक्त पदभरतीसाठी बिंदूनामावली तपासणी शिबिराला गुरुवार (दि. २)पासून साताऱ्यातून सुरूवात होत आहे. तरी महाविद्यालयांनी रिक्त पदांची बिंदूनामावली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावली १ ऑक्टोबर २०१७ रोजी जाहीर केली आहे. या पदमान्यतेनुसार बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी युध्द पातळीवर सुरु केली आहे. महाविद्यालयातील बिंदुनामावली तपासणी उपकुलसचिव यांच्या नेतृत्वाखाली तीन



▪ सातारा जिल्हा २ डिसेंबर, सांगली जिल्हा ४ डिसेंबर तर कोल्हापूर जिल्ह्यातील ९ डिसेंबर रोजी होणार तपासणी

पथके नेमली आहेत. सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी शिबिर आज २ डिसेंबर रोजी कराड येथील सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय येथे करण्यात येणार आहे. सांगली जिल्ह्यातील महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी शिबिर शनिवार ४ डिसेंबर रोजी सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय येथे होणार आहे. तर कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी शिबिर गुरुवार ९ डिसेंबर रोजी कोल्हापुरातील न्यू कॉलेज येथे होणार आहे. यासंदर्भातील सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना ई–मेलव्दारे दिल्या आहेत. तरी सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठ व शासन यांच्या सूचनेनुसार बिंदूनामावली करून घ्यावी, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी केले आहे.

### महाविद्यालय प्रशासनाने सहकार्य करावे

विद्यापीठ प्रशासनातर्फे रोष्टर तपासणे, पदमान्यता, जाहिरात मंजुरी व निवड समिती या चारही बाबींची विहित वेळेत पूर्तता करण्याचे प्रयत्न आहेत. तरी सर्व संबंधित महाविद्यालयीन प्रशासनाने सहकार्य करावे. विद्यापीठातील संबंधित अधिकारी याबाबतीत सर्व सहकार्य करतील.

**डॉ. पी. एस. पाटील** (प्र–कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

लोकमत

# विशेष कक्षातर्फे आजपासून बिंदुनामावली तपासणी शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथिल करण्याबाबतचा शासन निर्णय आणि शिक्षण सहसंचालकांच्या पत्रानुसार महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या विशेष कक्षातर्फे तपासणी शिबिर आयोजित केले आहे.

महाविद्यालयातील बिंदुनामावली तपासण्यासाठी उपकुलसचिव श्रेणीच्या अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली तीन पथके केली आहे. या पथकाद्वारे बिंदुनामावली तपासणी आज, गुरुवारी सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात होईल.

> विद्यापीठ शासनातर्फे रोष्टर तपासणे, पदमान्यता, जाहिरात मंजुरी व निवड समिती या चारही बाबींची विहित वेळेत पूर्तता करण्याचे प्रयत्न राहतील. सर्व संबंधित महाविद्यालयीन प्रशासनाने सहकार्य करावे.
>
> **-डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरू**

सांगली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांसाठी सांगली येथील मथूबाई गरवारे कन्या महाविद्यालयात दि. ४ डिसेंबर रोजी, तर कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांसाठी न्यू कॉलेजमध्ये दि. ९ डिसेंबर रोजी शिबिर होणार आहे, अशी माहिती विशेष कक्षाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी दिली.


पुढारी

# शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची तपासणी करण्यासाठी शिबीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये दि. २ ते ९ डिसेंबर या कालावधीत रिक्त पदे भरण्याकरीता महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करण्यासाठी शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

२ डिसेंबरला सातारा जिल्हयातील महाविद्यालयासाठी कराड येथील सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालयात, ४ डिसेंबरला सांगली जिल्हयातील सर्व महाविद्यालयासाठी सांगली येथील



मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, ९ डिसेंबर रोजी कोल्हापूर जिल्हयातील सर्व महाविद्यालयासाठी न्यू कॉलेज येथे शिबिर होणार आहे असे डॉ पी.एस. पांडव यांनी कळविले आहे. सर्व महाविद्यालयांनी आपल्या शिक्षक बिंदूनामावलीची विद्यापीठाद्वारे प्राथमिक तपासणी पूर्ण करून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

लोकमत

# रवींद्र कोल्हेंना 'क्रांतिअग्रणी' पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

पलूस (जि. सांगली) : क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या नावाने देण्यात येणारा यंदाचा 'क्रांतिअग्रणी' पुरस्कार डॉ. रवींद्र कोल्हे यांना जाहीर झाला आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४) कुंडल (ता. पलूस) येथे प्रदान समारंभ होणार आहे, अशी माहिती आमदार अरुण लाड यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. एक लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



आ. लाड म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या नावे दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. सामाजिक कार्यात अमूल्य योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराने सन्मान केला जातो. बैरागड (मेळघाट, जि. अमरावती) येथे आदिवासी समाजातील रुग्णांना केवळ एका रुपयात सर्व ती आरोग्य सेवा देण्याचे कार्य डॉ. रवींद्र कोल्हे करत आहेत. यासाठी त्यांना त्यांच्या पत्नी स्मिता कोल्हे यांचे सहकार्य मिळत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन 'क्रांतिअग्रणी' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले जाणार आहे.

02 DEC 2021 **लोकमत** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात विवेकानंद महाविद्यालय आयोजित बॅडमिंटन पुरुष आणि महिला स्पर्धेचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी राजेंद्र रायकर, बाबासाहेब उलपे, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात विभागीय क्रीडा स्पर्धा सुरू

## विवेकानंदमध्ये बॅडमिंटन स्पर्धा : विविध अकरा संघ सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय क्रीडा स्पर्धेचा प्रारंभ झाला. त्यात विवेकानंद महाविद्यालय आयोजित बॅडमिंटन पुरुष आणि महिला स्पर्धेचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये पुरुष आणि महिला असे एकूण अकरा संघ सहभागी झाले आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अभ्यासाबरोबरच खेळाच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती आणि प्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा, असे आवाहन प्राचार्य साळुंखे यांनी केले. यावेळी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व खेळ अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, विभागीय सचिव डॉ. इब्राहीम मुल्ला, प्रा. डॉ. शरद बनसोडे, विजय रोकडे, स्पर्धा संयोजक सचिव प्रा. किरण पाटील उपस्थित होते. प्रा. सहिदा कच्छी, संतोष कुंडले, समीर पठाण, सुरेश चरापले, राम बोंगे, संजय पोवार यांनी स्पर्धेचे संयोजन केले आहे.

लोकसत्ता

# डॉ. रवींद्र कोल्हे यांना पुरस्कार

**सांगली :** जेष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांना यंदाचा क्रांती अग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. स्वातंत्र्यसेनानी क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे आ. अरुण लाड यांनी सांगितले. प्रतिसरकारच्या तुफान सेनेचे सरसेनापती म्हणून जी.डी. बापू प्रसिद्ध होते. त्यांच्या स्मृत्यर्थ क्रांतिअग्रणी हा पुरस्कार देण्यात येणार असून यंदाचा पुरस्कार बैरागड (मेळघाट) येथील डॉ. रवींद्र कोल्हे यांना प्रदान करण्यात येणार आहे. ४ डिसेंबर रोजी कुंडल ग्रामपंचायतसमोर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला असल्याचे आ. लाड यांनी सांगितले.

लोकसत्ता

# २०२३ हे तृणधान्य वर्ष

## विविध उपक्रम राबविण्याची 'यूजीसी'ची सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारताच्या प्रस्तावानुसार संयुक्त राष्ट्रांनी २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे तृणधान्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळण्यासाठी, त्याविषयी जनजागृती होण्यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावर कार्यशाळा, चर्चासत्र आदी उपक्रम राबवावेत, उच्च शिक्षण संस्थांतील उपाहारगृहांतील आहारपत्रकात तृणधान्यांचा समावेश करण्याच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिल्या आहेत.

हवामान अनुकूल आणि पोषणमूल्य असलेल्या तृणधान्यांचे उत्पादन, उत्पादकता वाढवण्याबाबत जागतिक स्तरावर जागृती करणे हा आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष साजरे करण्याचा उद्देश असल्याचे नमूद करत या संदर्भात यूजीसीकडून परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करावे, त्याअंतर्गत स्थूलता, मधुमेह अशा आरोग्य समस्यांना तोंड देण्यात तृणधान्यांच्या उपयोगाबाबत जागृती, तृणधान्यांच्या सेवनाच्या फायद्यांबाबत माहिती देणारे फलक महाविद्यालय, विद्यापीठ आवारात लावावेत, तृणधान्यांच्या फायद्यांबाबत कार्यशाळा, चर्चासत्रांचे आयोजन करावे, उच्च शिक्षण संस्थांतील उपाहारगृहांतील आहार वेळापत्रकात तृणधान्यांचा समावेश करावा, तृणधान्यांच्या पोषणमूल्यांबाबतचा पाठ गृह विज्ञान विभागांमध्ये समाविष्ट करावा अशा उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

पुढारी

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसअॅबॅलिटीज, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त (३ डिसेंबर) दुपारी तीन वाजता ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथील निवांत अंध मुक्त निवासालयाच्या संस्थापिका मीरा बडवे प्रमुख पाहुण्या असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, लेखिका सोनाली नवांगुळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पुढारी

# हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्डतर्फे कार्यक्रमाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड कोल्हापूर यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता समर्थ विद्या मंदिर, उचगाव (ता. करवीर) येथे हा कार्यक्रम होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे असणार आहेत. तर राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेचे (नाबार्ड) माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.

यावेळी आयआयटी कानपूर मधून एम.टेक. करणाऱ्या पहिल्या महिला श्रीमती अनिता दांडेकर यांना 'अपंगमित्र पुरस्कार' तर साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या लेखिका श्रीमती सोनाली नवांगुळ यांना 'भरारी पुरस्कार' प्रदान केला जाणार आहे. तसेच कार्यक्रमात अन्य गुणवंतांचा सत्कार केला जाणार आहे. अशी माहिती हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्डचे अध्यक्ष प्रमोद देशपांडे यांनी दिली.


पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धा आजपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धेचे आयोजन भोगावती महाविद्यालय कुरुकली (ता. करवीर) यांच्या वतीने करण्यात आले आहे. २ व ३ डिसेंबर रोजी कसबा बावडा येथील लाईन बझार हॉकी मैदानावर या स्पर्धा होतील.

स्पर्धेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या हस्ते व भोगावती शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन जयसिंग हुजरे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सर्जेराव पाटील



सर्व संचालक मंडळ तसेच कॉलेजचे प्राचार्य राजाराम सरनोबत, उपप्राचार्य प्रा. एन. एम. पाटील व प्रा. राजेंद्र हंकारे, प्रा. सुनील खराडे, शारीरिक शिक्षण संचालक राहुल लहाने यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. क्रीडाप्रेमींनी लाभ घेण्याचे आवाहन दि डिस्ट्रीक्ट हॉकी असोसिएशन अध्यक्ष सागर यवलुजे, हॉकी कोल्हापूरचे सचिव मोहन भांडवले यांनी केले आहे.